# नियमित दिवाणी दावा क्र. ७५/२०१९ मधील निशाणी ५५ वरील आदेश

( लक्ष्मण गोळे वि. संजय गोळे )

प्रस्तुतचा अर्ज वादी याने प्रतिवादीच्या प्रतिदाव्यास जबाब व कैफियत देणेसाठी झालेला विलंब माफ होवून जबाब व कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या कथनानुसार, वादी यांनी मौजे माहुर येथील मिळकतीसंबंधी प्रतिवादींविरुध्द वाटप, स्वतंत्र कब्जा व निरंतर ताकिदीसाठी दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे प्रतिवादी यांनी वादी विरुध्द प्रतिदावा दाखल केला आहे. परंतु, कोव्हीड—१९ साथीच्या रोगामुळे महसुल संबंधी आवश्यक कागदपत्रे वादी यांना मिळविणे शक्य झाले नाही. कोव्हीड — १९ मुळे झालेल्या टाळेबंदीमुळे वादी यांना सासवडला येथे शक्य नव्हते. त्यामुळे वादी यांना प्रतिवादी यांच्या प्रतिदाव्यास कैफियत दाखल करणेस विलंब झालेला आहे. तसेच सदरचा विलंब माफ होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असून दाव्याचा गुणदोषावर निर्णय होणेसाठीदेखील सदर वादीची कैफियत व जबाब दाव्यामध्ये समाविष्ट होणे अत्यंत आवश्यक आहे. तरी, नमुद वस्तुस्थितींचा विचार करता सदरचा विलंब हा प्रस्तुत वादीच्या निष्काळजीपणामुळे झालेला नाही. प्रस्तुत वादीला संधी न दिल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे अपरिमित नुकसान होणार असून प्रस्तुत दावा गुणदोषावर निकाली काढता येणार नाही. त्यामुळे वादीला कैफियत व जबाब दाखल करणेस झालेला सुमारे १६ महिन्याचा विलंब माफ करण्यात येवून कैफियत व मनाई अर्जास जबाब दाखल करुन घ्यावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दिलेले आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, अर्जातील संपुर्ण मजकुर खोटा व बनावटी आहे.

अर्जातील नमूद कारणे संयुक्तिक नाही. वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला असल्यसामुळे वादीने दिलेले महसुली दस्ताऐवजचे कारण लबाडीचे दिसून येते. प्रस्तुतचा विलंब हा अक्षम्य स्वरुपाचा असून अर्ज नामंजुर करण्यात यावा. प्रस्तुत अर्ज मंजुर करणेबाबत न्यायालयाचे मत झाल्यास विलंबाचा अवधी पाहता जास्तीत जास्त खर्चावर अर्ज मंजुर करण्यात यावा.

४. अर्ज व प्रतिवादीचे म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखांचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा ठराव व निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे.

५. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ८ नियम १ नुसार दाव्यात समन्स बजावल्याच्या दिवसापासुन ३० दिवसांच्या आत व न्यायालयाच्या परवानगीने जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत दाखल करावयाची असते. परंतु, प्रस्तुत वादी याने विहीत मुदतीत प्रतिवादीच्या प्रतिदाव्यास कैफियत दाखल केलेली नाही. अभिलेखाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी यांनी दि. २०/०१/२०२० रोजी कैफियत सोबत प्रतिदावा दाखल केलेला आहे. त्यानंतरदेखील प्रत्येक तारखेस वादी यांनी त्यांचे लाभात झालेला मनाईचा हुकूम वाढविला आहे. म्हणजेच वादी व वादीचे वकील प्रत्येक तारखेस दाव्यात हजर आहेत असे दिसून येते. परंतु, दि. २०/०१/२०२० नंतर माहे मार्च २०२० मध्ये कोरोनाच्या महामारीमुळे संपुर्ण देशात टाळेबंदी घोषित करण्यात आलेली होती. सदर टाळेबंदी माहे ऑगस्ट २०२१ पर्यंत महाराष्ट्रात अस्तित्वात होती ही बाब देखील लक्षात घेतली पाहिजे. याउपरांत, नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रत्येक व्यक्तिला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिली पाहिजे. तसेच सदर प्रतिदावा गुणवत्तेवर निर्णीत करण्यासाठी प्रस्तुत वादीचे म्हणणे अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्यामुळे वादी यांनी अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तिक वाटते. वरील सर्व परिस्थितींचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज खर्चावर

मंजुर करणे योग्य होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** वादीचा अर्ज रुपये ५००/— च्या खर्चावर मंजुर करण्यात येतो.

**२.** वादी यांनी खर्चाची रक्कम भरल्यानंतर सदर वादीची कैफियत व जबाब अभिलेखावर घेण्यात यावा.

**सही/—**

**(श्रीमती डी. एम. पाटील)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सासवड.

दिनांक : १४/१०/२०२१
ठिकाण : सासवड

**-: C E R T I F I C A T E :-**

"I affirm that the contents of this P.D.F. file order are same word for word as per original order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer (Grade 3) | : | Mrs. S. R.Kamble |
| Name of the P. O. | : | Smt. D. M. Patil, 2nd Jt. C.J.J.D & J.M.F.C., Saswad. |
| Date of Order | : | 14/10/2021 |
| Order signed by presiding officer on | : | 20/10/2021 |
| Order uploaded on | : | 20/10/2021 |